# रस्ता (गूढकथा)

①

आज तरी घरी लवकर जावं म्हणून ऑफिसच्या कॅफेटेरिया मधून धडधड पायऱ्या उतरत प्रज्ञा खाली येऊ लागलेली. तिच्या मागून शालिनी म्हणजे तिची कलिग तिला हाका मारतच होती,
"अग प्रज्ञा थांब की, हळू पळ ना, किती ती घाई?"

यावर हसत हसतच प्रज्ञा म्हणाली,
"घाई तर आहे बाबा, नाहीतर दादा माझ्या वाटणीच्या शिऱ्यावर डल्ला मारेल!"

बोलत बोलत फटाफट नेट ऑन करून तिने कॅब बूक केली. आणि आईला फोन लावायला लागली.

"हॅलो आई, अग काल दत्त जयंतीच्या प्रसादाचा शिरा राहिला आहे ना? तो कोणाला देवू नकोस. मी तो आल्यावर खाणार आहे."

आई- "हो गं. ठेवला आहे मी. ये तू लवकर."

"हो. हो, निघतेच आहे. बाय"

फोन ठेवताच तिची नजर रस्त्यावर गेली, रस्त्याच्या मधोमध एक माणूस एकदम तल्लीन होवून मोबाईलवर चॅटिंग करत चालला होता.

Date :

Page :

प्रज्ञा त्याकडे 'काय बावळट माणूस आहे' अशा नजरेने एकवार पाहात, धीरजला मेसेज करायला घेते. सहजच तीच लक्ष रस्त्याकडे जातं. दोन्ही बाजूंनी जमलेली झाडांची दाटी, त्यांची ती थरथर हलणारी झाडाची पाने, त्यातून मधूनच डोकावनारा चंद्र...
वातावरण अजूनच गूढ बनवत होता. कालच पोर्णिमा होवून गेलेली म्हणून आज आभाळ निरभ्र होते. रस्ता रहदारीचा होता, गाड्यांची वर्दळ ही बऱ्यापैकी होती. आता दोन्ही बाजूंनी दोन बस समोरासमोर येत होत्या. तरीही तो माणूस अजूनही आहे त्या जागीच होता. मोबाईल च्या डिस्प्लेचा हिरवट उजेड त्याच्या तोंडावर पडत होता,

आणि त्याची नजर तिच्या कडे वळली... प्रज्ञाकडे बघून तो गुढ हसला आणि बोटाचा इशारा करुन तो तिला रस्त्यावर बोलवू लागला बधीर झाल्यासारखी ती, तिची इच्छा नसतानाही उरलेल्या पायऱ्या उतरु लागली. जणू एक प्रकारचे जडत्व तिच्या पायात आलेले... भारवल्या सारखी रस्त्याकडे एकटक बघत ती पुढे पुढे निघाली.
तो माणूस अजूनही तिथच थांबला होता. आणि आता त्याचे डोळे लाल होवून चमकत होते. बसचे अंतर ही थोडेच राहिलेले. प्रज्ञा आता बरोबर

रस्त्याच्या मधोमध आली, आणि तिथेच कशाला तरी अडखळून जागीच थांबली. अंधारात तिथे सोनेरी छोटीछोटी पाऊले उमटली होती, जी सोबत चंदनाचा सुगंध घेऊन आली होती. एक पांढरा शुभ्र तेजःपुंज प्रकाश तिच्या भोवताली पडला... त्यातून एक पितांबर नेसलेली, सर्वांगावर केशरी नाम ओढलेली, त्यांच्या सोबत एक श्वेतवर्णी धेनु आणि श्वान होते. त्यातून तसाच एक तेजोमय हात तिच्या पुढे आला आणि तिला रस्ता पार करून पलीकडे सोबत घेवून गेला.

ते चार पाच क्षण तिच्या सर्वांगा-वरून जणू विद्युत लहरी दौडत होत्या, शहा-यावर- शहारे येत होते.. आणि मनात फक्त एकच गजर सुरू होता...

॥दत्त दत्त गुरुदेव दत्त॥ जाता जाता तिने एकदाच मागे वळून पाहिले, तिला रस्त्याच्या मधोमध बोलवणारी ती शक्ती त्या दोन वसच्या मध्ये धुरासारखी विरत होती. पलीकडे - पोहोचल्यावर तिला आठवले, काल याच रस्त्यावरून दत्त गुरुंची दिंडी गेली होती. आणि आज त्या वाईट शक्ती पासून त्यांनीच तिला वाचवले होते.



- नंदिनी नितेश राजापूरकर
8830506058